क्र.प्रा/प्राशा/खाप्राशा/मान्यता/९७-९८ ८२५८
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक:- 14 AUG 1997

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद पुणे विभाग,

शिक्षण प्रमुख / ~~प्रशासन अधिकारी~~,
महानगर/नगरपालिका शिक्षण मंडळ पुणे

विषय:- सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना नुतनीकरणात परवानगी देणेबाबत...

संदर्भ:- शासनाकडील सचिव शिक्षण विभागाकडील क्रमांक [illegible] (२४५) प्राशि-५ दि. ८-५-९६ ....................

वरील विषयासंबंधीच्या शासनाकडील संदर्भाधीन पत्रान्वये सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षामध्ये खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. तथापी खाली नमूद केलेल्या संस्थेच्या शाळेने शासनाकडून परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षामध्ये म्हणजेच सन ९६-९७ मध्ये शाळा सुरु केलेली नसल्याने त्याच परवानगीचे सन या शैक्षणिक वर्षात नुतनीकरण करुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार सदरहू संस्थेच्या खाली नमूद केलेल्या शाळेस सन १९९७-९८ मध्ये इ.१ ली च्या एक वर्गास नुतनीकरणात प्राथमिक शाळा सुरु करण्यास विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर जून ९७ पासून परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १) | सेवासदन सोसायटी पुणे | एरंडवणा, पुणे | इ.१ ली चा वर्ग | इंग्रजी |

तरी त्याप्रमाणे संबंधित शाळेस कळविण्यात यावे.

[illegible]

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ करिता

प्रत:- सचिव/अध्यक्ष
सेवासदन इंग्लिश मिडीयम ....................
.......... स.नं. ८ व १३, एरंडवणा पटवर्धन बाग

Principal
Sevasadan English Medium School

General Secretary
Pune Sevasadan Society

Sevasadan English Medium School Pune

परवानगी वर्ष : २००५-२० ०६
माध्यम : इंग्रजी
कायम विना अनुदान.

जा.क्र.माध्य-३/१४/प्रथम मान्यता/पुवि/२० ०६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक :-
12 9 MAY 2006

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे.

विषय :- प्रथम मान्यता . . .
सेवासदन इंग्लिश मिडीयम स्कूल, एरंडवणे, पुणे-४.

संदर्भ :- १. आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ई-४/पु.मा/१०८/०६ दि. २६. ४. ०६

२. शा.प.क्र. नमाशा-१००५/[३०८/०५] माशि-१ दि. २८. ६. ०५.

३. कार्यालयाचे पत्र क्रं माध्य-३/१४/नमाशा/मान्यता/पुवि/०५/२६१०२/०६/ दि. ९/१२/०५.

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये पुणे सेवासदन सोसायटी, सदाशिव पेठ, पुणे-३० संस्थेच्या सेवासदन इंग्लिश मिडीयम स्कूल, एरंडवणे, पुणे-४ माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गास २००५-२००६ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००५ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्तता अधिन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत असे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतचा अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे १ यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाते उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सूचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोबतच्या अटींची पूर्तता करण्याच्या अटीवरच सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

स्वाक्षरीत शि. उ. स. यांची
सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे -१ करिता

प्रत - १. मुख्याध्यापक, सेवासदन इंग्लिश मिडीयम स्कूल, एरंडवणे, पुणे-४.
२. निवड नस्ती

Sevasadan English Medium School, Pune

Principal
Sevasadan English Medium School

General Secretary
Pune Sevasadan Society